


(क) अरब
अरबांचा उदय
इस्लामचा उदय
अरबांचा साम्राज्य विस्तार
अरबांचे आर्थिक जीवन
अरबांचे सांस्कृतिक जीवन
अरबांचे योगदान
व्यापार वाढ
जगाशी संपर्क
शिकवण
प्रसार
खिलाफत
व्यापार वाढ
ज्ञान, विज्ञान आणि साहित्य
कला व स्थापत्य


इ.स. ५७१ महंमद पैगंबर यांचा जन्म
इ.स. ६२२ पैगंबरांचे मक्केहून मदिनेला स्थलांतर
इ.स.६३० मक्केवर विजय
इ.स. ६३२ अबू बक्र खलिफा
इ.स. ८०१ भारताशी संपर्क
इ.स. १० वे शतक अल्-बेरुनी भारतात
इ.स. १२५८ तुर्कांचा उदय




नकाशाचा जो रंगीत (काळसर) भाग दाखविला आहे तेवढा अरब साम्राज्याचा विस्तार झाला होता.

- अरबांचा उदय –


- आशियाच्या नैऋत्येकडील द्विपकल्पीय (पाण्यात घुसलेला जमिनीचा निमुळता भाग. उदा – भारताचे दक्षिण टोक) भागात अरब संस्कृतीचा उदय झाला.
- सुरुवातीला हा प्रदेश इजिप्त व रोमन संस्कृतीच्या प्रभावाखाली होता.
- कालांतराने अरबांनी हा प्रदेश व्यापल्याने त्यास अरेबिया (अरबस्तान) या नावाने ओळखले जाऊ लागले.

- भटके जीवन जगणाऱ्या अरबांच्या टोळया अरबस्तानात स्थिरावल्या.
- या वसाहती म्हणजे अरबांची सुरुवातीची गावे होती.
- ही गावे म्हणजे त्यांची स्वतंत्र राज्ये होती.
- शेत जमीन अतिशय कमी असल्यामुळे जमिनी बळकाविण्यासाठी त्यांचे आपापसात तीव्र संघर्ष होत.
- वाळवंटी भाग व गवताळ प्रदेश यामुळे अरब लोक पशुपालनाचा व्यवसाय करु लागले.

- प्राचीन काळात अरब निसर्ग पूजक  होते.
- ते मक्केजवळील काबा येथील उल्कापाषणाची पूजा करत.
- काबा हे त्यांचे पवित्र केंद्र होते.
- मक्का हे अरबांचे श्रध्दास्थान व उत्सवांचे केंद्र होते.
- मक्केच्या यात्रेत संगीत व साहित्यातील नैपुण्याच्या स्पर्धा होत.
- अरबांनी लोकसंगीताचा विकास केला.



# काबा मुस्लिमांचे धार्मिक ठिकाण



- अरबांची उत्पादनाची साधने मर्यादित असल्याने त्यांनी व्यापारावर लक्ष केंद्रित केले.
- व्यापारात वाढ झाल्याने अरब टोळयांचे मोठया व्यापारी संघात परिवर्तन झाले.
- अरब भारत व चीनमधून वस्तू आयात करीत व त्या युरोपात निर्यात करीत असत.

- घोड्यांच्या व्यापारात अरबांची मक्तेदारीच होती.
- पुढे अरबांनी आंतरखंडीय व्यापारावर वर्चस्व मिळवले.
- त्यामुळे अरबांची आर्थिक परिस्थिती मोठया प्रमाणावर सुधारली.
- जगातील निरनिराळया बाजारपेठांशी त्यांचा संपर्क येत असे.
- अरबांनी पूर्वेकडील संस्कृतीमधील ज्ञान प्राप्त केले, ज्ञान भाषांतरित करुन ग्रंथबध्द केले आणि पश्चिमेकडील देशांमध्ये पोहोचविले.

❖ इस्लामचा उदय –

- हजरत मुहम्मद पैगंबर यांचा जन्म इ.स. ५७१ मध्ये मक्का येथे कुरेशी घराण्यात झाला.
- मुहम्मद पैगंबराचे आजोबा एका व्यापारी तांडयाचे प्रमुख होते.
- पैगंबर यांचा एकेश्वरी धार्मिक विचारांशी संपर्क आला.
- मुहम्मद पैगंबरांना वयाच्या ४० व्या वर्षी ईश्वरी साक्षात्कार झाला.


- जिब्रईल या देवदूताने हे ईश्वरी संदेश त्यांना दिले.
- ईश्वराचे हे संदेश “कुरआन शरीफ” या पवित्र ग्रंथात एकत्रित केलेले आहेत.
- पैगंबरांच्या उपदेश वचनांचा संग्रह “हादीस” म्हणून प्रसिध्द आहे.
- कुरआन या पवित्र ग्रंथावर आधारलेल्या या धर्मास “इस्लाम” असे म्हणत.
- या धर्माचे अनुयायी मुस्लीम (मुसलमान) म्हणून ओळखले जातात.

- मुहम्मद पैगंबराची पत्नी खदीजा, जावई अली, मित्र अबू बक्र आणि सहकारी झैद हे इस्लामचे पहिले चार अनुयायी होते.
- अरबांनी इस्लाम धर्म स्वीकारण्यास सुरुवात केल्यावर मक्केतील सनातनी अरबांनी विरोध केला .
- मदीनेतील अनुयायांच्या विनंतीवरून पैगंबर मक्केहून मदीनेस इ.स. ६२२ मध्ये गेले .
- ही ऐतिहासिक घटना “हिजरा” म्हणून ओळखली जाते.
- या घटनेमुळे हिजरी ही नवीन कालगणना इस्लाम धर्मात सुरु झाली.

## ❖ इस्लामची शिकवण –

- इस्लाम या शब्दाचा अर्थ ईश्वराला संपूर्ण शरण जाणे हा होय.
- परमेश्वरावर नितांत श्रध्दा आणि त्यांच्या इच्छांचे पालन इस्लाममध्ये अभिप्रेत आहे.
- प्रत्येक मुस्लिमाने अशी श्रध्दा बाळगावी की अल्लाह एकच असून मुहम्मद पैगंबर हे त्याचे प्रेषित आहे.
- प्रत्येक मुस्लिमाने कुरआनातील आज्ञांचे पालन करावे.

- प्रत्येक व्यक्तीच्या कर्मानुसार अल्लाह शेवटी तिच्या पाप –पुण्याचा न्यायनिवाडा करतो.
- त्या न्यायनिवाडयाच्या दिवसास “कयामत” असे म्हणतात.
- प्रत्येक मुस्लिमाने पुढील पाच प्रमुख आज्ञांचे पालन केले पाहिजे.



# इस्लाम - प्रमुख वैशिष्टये

- कर्मकांडास नकार
- मूर्तीपूजा अमान्य
- सर्वांशी समान न्यायाने वागणूक
- आई-वडिलांविषयी आदर
- मादक पदार्थ निषिध्द


## ❖ इस्लामचा प्रसार –

- पैगंबर यांनी मदीना येथे नवे धर्माधिष्ठित राज्य स्थापन केले.
- या राज्यातील सर्व प्रथा व कायदे कुराण शरीफवर आधारलेले होते.
- हजरत मुहम्मदांनी मदीनेच्या आसपासची शहरे व मक्का जिंकले.
- मक्केच्या विजयानंतर व इस्लामच्या प्रभावाने लोकांनी इस्लामचा स्वीकार केला.
- त्यामुळे अरबस्तान हे एक प्रबळ राज्य बनले.

❖ खिलाफत –

- खिलाफत ही संज्ञा इस्लामच्या धार्मिक व राजकीय परंपरेस उद्देशून वापरतात. खलिफा म्हणजे प्रेषितांचा वारस म्हणून तो धर्म प्रमुख व राज्य प्रमुख
- इ.स. ६३२ मध्ये मुहम्मद पैगंबरांचा मृत्यू झाला.
- अबू बक्र हे त्यांचे वारसदार म्हणून खलिफा बनले.
- हजरत मुहम्मदांचे सहकारी अबू बक्र , उमर, उस्मान आणि अली हे पहिले चार खलिफा होत.



अबू बक्र


उमर


उस्मान


अली

- खलिफा हे एकाच वेळी इस्लाम धर्माचे व इस्लामी राज्याचे प्रमुख होते.




The Spread of Islam. The rapid spread of Islam created within a century a unified cultural and economic zone from India to the Atlantic Ocean within.

- ❖ अरब साम्राज्याचा विस्तार –

- ▪ अबू बक्र यांनी बायझन्टाईन साम्राज्यातील सिरिया या प्रांताचा काही भाग जिंकला.
- ▪ खलिफा उमर यांनी सिरियाचा उरलेला भाग आणि मेसोपोटेमिया (इराक), पर्शिया(इराण), इजिप्त हे देश जिंकून घेतले.

- पुढील काळात उत्तर आफ्रिकेचा भाग, पश्चिम आशिया आणि स्पेन इत्यादी देशांचा अरबस्तानात समावेश झाल्यामुळे अरब साम्राज्याचा मोठया प्रमाणात विस्तार झाला.
- मक्का आणि मदीना या पवित्र शहरांनंतर जेरुसलेम हे तिसरे पवित्र शहर म्हणून ओळखले जावू लागले.
- उमईद या घराण्यातील खलिफांच्या कारकिर्दीत अरबांनी पूर्वेकडे समरकंद पर्यंतचा प्रदेश जिंकून घेतला.
- दक्षिणेकडे सिंधपर्यंतचा भाग जिंकला होता.
- उमईद घराण्यानंतर अबासिद घराणे सत्त्तेवर आले.

- अबासिद घराण्याने अरब साम्राज्याची राजधानी दमास्कसहून बगदादला नेली.
- बगदाद हे शैक्षणिक केंद्र बनले.
- कॉन्स्टॅन्टिनोपल हे या भागातील अत्यंत महत्त्वाचे व्यापारी केंद्र बनले.
- इ.स. १२५८ मध्ये तुर्कांच्या उदयामुळे अरब साम्राज्याची एकवटलेली सत्ता लयाला जाऊ लागली.

## ❖ आर्थिक व सांस्कृतिक जीवन –

➢ अरबांचे आर्थिक जीवन –

- अरबांनी धातू कामाच्या व्यवसायात खूपच प्रगती केली.
- ते उत्तम प्रतीच्या काचवस्तू आणि मातीची भांडीसुध्दा बनवीत असत.
- उत्कृष्ट दर्जाची अत्तरे व सुगंधी द्रव्ये यासाठी ते ओळखले जात.

- रोमन साम्राज्याच्या ऱ्हासानंतर जागतिक व्यापारी मार्गांवर अरबांनी ताबा मिळविला.
- बगदाद, बुखारा, समरकंद व दमास्कस या शहरांना जागतिक बाजारपेठेचे स्थान प्राप्त झाले.
- अरबांच्या व्यापारामुळे पूर्वेकडील व पश्चिमेकडील जग एकमेकांना जोडले गेले.

➢ **शेती -**

- अरब लोक पाण्याच्या उपलब्धतेनुसार विविध पिके घेत असत.
- अरबांच्या व्यापार व कृषी क्षेत्रातील कामगिरीमुळे त्यांचे आर्थिक जीवन संपन्न झाले.

- अरबांचे सांस्कृतिक जीवन –

- अरब संस्कृतीने युरोपातील ग्रीक व रोमन संस्कृती आणि आशियातील इराणी व भारतीय संस्कृतीमधील चांगल्या गोष्टी स्वीकारल्या.
- अरबांनी ज्ञानविज्ञान, कला व स्थापत्य यात भरीव कामगिरी केली.
- खलिफांनी ज्ञान आणि कला यांविषयी जी विशेष आस्था दाखविली त्यामुळे भावी सांस्कृतिक प्रगती शक्य झाली.

## ❖ अरबांचे योगदान –

- अरबांच्या योगदानामुळे जागतिक संस्कृती अधिक समृध्द झाली.
- विदेशातील महत्त्वपूर्ण ग्रंथ येथे भाषांतरित केले जात.
- अरब व्यापाऱ्यांनी आशियायी वनस्पती युरोपात आणल्या.
- यामध्ये संत्री, लिंबू, खजूर, जर्दाळू (Apricot), पीच इत्यादी फळांचा व अनेक फुलांचा समावेश होता.



खजूर



जर्दाळू



लिंबू



पीच



संत्री

- बगदाद विद्वत्तेचे माहेरघर म्हणून ओळखले जाऊ लागले.
- त्याचबरोबर अरब काळात कारडोवा, लिस्बन, कैरो ही विदयापीठे ही प्रसिध्द होती.
- स्पेनमधील कारडोवा हे अरबी भाषेचे अध्ययन केंद्र म्हणून प्रसिध्दीस आले.




कारडोवा विद्यापीठ



कैरो विद्यापीठ


- अरबस्तानातील अल-अजहर विद्यापीठात त्या काळी एका वेळी १२००० विद्यार्थी शिक्षण घेत असत.
- अरबी विद्यापीठांनी मध्ययुगीन युरोपातील ऑक्सफर्ड आणि पॅरिस यांसारख्या विद्यापीठांना प्रेरणा दिली.



अल-अजहर विद्यापीठ

❖ ज्ञान, विज्ञान आणि साहित्य –


- अरब साहित्यात कशिदा हा काव्याचा तर हितायत हा गदय प्रकार रुढ होता.
- जगप्रसिध्द “अरेबियन नाइटस” मधील कथा याच काळात निर्माण झाल्या.
- त्यामूळ अरबी भाषेत आहेत.
- इब्न-रशिद हा श्रेष्ठ अरब तत्त्वज्ञ होता.




इब्न-रशिद

- प्रसिध्द कवी उमर खय्याम व थोर तत्त्ववेत्ता, महान इतिहासकार इब्न-खल्दून याच काळात होऊन गेले.
- गणितातील अंक व शून्य या भारतीय कल्पना अरबांकडून युरोपियनांना ज्ञात झाल्या.
- बीजगणिताला दिलेले अलजेब्रा हे नाव मूळ अरबी भाषेतीलच आहे.

उमर खय्याम





इब्न-खल्दून

- इ.स. १४ व्या शतकात होऊन गेलेला इतिहासकार इब्न- खल्दून याने इतिहासावर हवामान, भौगोलिक वातावरण, अध्यात्मिक विचार यांचे प्रभाव कसे पडतात याबाबत विवेचन केले आहे.
- इब्न-बतुता या अरब इतिहासकाराने भारताला भेट दिली आणि "सफरनामा" हा ग्रंथ लिहिला.



इब्न-बतुता

- सिना तथा अव्हिसिना हा विचारवंत अरबी ज्ञानपरंपरेचा मुकुटमणी मानला जातो.
- त्याने वैदयक शास्त्र, तत्त्वज्ञान, भूमिती आणि खगोलशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले.
- त्याने प्राचीन ग्रीक परंपरेतील ज्ञान भांडार मुस्लिम जगतापुढे खुले केले.
- इ.स. १० व्या शतकात इतिहासकार अल-बेरुनी याने भारताला भेट दिली आणि प्रवासवर्णन लिहून ठेवले.
- त्याने संस्कृत भाषेचा अभ्यास केला.
- "तारीख-ई-हिंद" हा त्याचा प्रसिध्द ग्रंथ होय.

अव्हिसिना







अल-बेरुनी

- कला आणि स्थापत्य –

- कला व स्थापत्याच्या क्षेत्रात अरबांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.
- त्यांनी नवे महामार्ग बांधले.
- तसेच त्यांनी रोमन साम्राज्याच्या काळातील व्यापारी मार्गांची दुरुस्ती केली.
- त्यांनी मध्य आशियात जलसिंचनासाठी नवे कालवे आणि नलिका बांधल्या.



- अर्धवर्तुळाकार कमान, घुमट, उत्तुंग मिनार आणि रेखीव नक्षीकाम व जाळीकाम ही अरबांच्या स्थापत्य शैलीची वैशिष्ट्ये होती.
- कारडोवा, कैरो, मक्का, मदीना आणि समरकंद येथील भव्य मशिदी या अरबी स्थापत्य शैलीची साक्ष देतात.





रेखीव नक्षीकाम व जाळीकाम

- ज्यावेळी  युरोप अज्ञानाच्या अंधकारात चाचपडत होता, त्यावेळी अरब संस्कृतीने ज्ञान-विज्ञानाची जोपासना केली.
- युरोपातील प्रबोधनाच्या चळवळीमागे अरबांची प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष प्रेरणा होती.
- अरबी संस्कृती पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतींना सांधणारा दुवा होती.

# Assessment

- योग्य जोड्या लावा.

| अ गट | ब गट |
|---|---|
| १. सफरनामा | १. अरबी कवी |
| २. सिना | २. विदयेचे माहेरघर |
| ३. कारडोवा | ३. मुकुटमणी |
| ४. बगदाद | ४. इब्न बतुता |
| | ५. विदयापीठ |

1- 4 , 2- 3 , 3- 5 , 4- 2

## Exercises

- अरबकालीन वास्तूंच्या चित्रांचा संग्रह करुन त्यांची माहिती मिळवा.
- अरब देशांची यादी करुन त्यांची राजधानी, लोकसंख्या, चलन, महत्त्वाची शिक्षण केंद्रे अशी माहिती इंटरनेटच्या सहाय्याने तयार करा.
- अरबांविषयीच्या कथा, इतिहास सांगणारी मराठी भाषेतील पुस्तके ग्रंथालयातून मिळवून वाचा.